ॲड.श्रीम.संगिता फड, विशेष सरकारी अभियोक्ता यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

कळवा पोलीस स्टेशन, जि.ठाणे येथिल गु.नो.क्र.३८०/२०१७ या गुन्हयांमधून उभ्दलेल्या मोक्का क्र.१८/२०१८, मा.सत्र न्यायालीन कामकाजासाठी.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीपी ०७१८/प्र.क्र.२६६/पोल-१०

गृह विभाग,२ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई-४०० ०३२
दिनांक : १७ जुलै, २०१९

संदर्भ शासन अधिसुचना, विधी व न्याय विभाग क्र. एसपीपी २०१८/यु.ओ.आर.६४/डी-१४, दिनांक ०७ डिसेंबर, २०१८.

शासन निर्णय:

कळवा पोलीस स्टेशन, जि.ठाणे येथिल गु.नो.क्र.३८०/२०१७ या गुन्हयांमधून उभ्दभवलेल्या मा.सत्र न्यायालय, मुंबई येथिल मोक्का क्र.१८/२०१८ या प्रकरणी न्यायालयीन कामकाज पाहण्यासाठी ॲड.श्रीम.संगिता फड यांची विधि व न्याय विभागाने वरील संदर्भात दि.०७ डिंसेबर, २०१८ च्या अधिसुचनेन्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणुन नियुक्ती केली आहे. तसेच ॲड.श्रीम.संगिता फड,विशेष सरकारी अभियोक्ता यांना शासकीय दराने फी अदा करण्यास मान्यता दिलेली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्रीम. सगिता फड, विशेष सरकारी अभियोक्ता यांना शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्रमांक मिटिंग २०११/(२४९)/डी-१४, दि.१५/०२/२०१४ मधील STATEMENT “F” मध्ये नमूद केलेल्या शासकीय दराने फी अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्रीम.सगिता फड, विशेष सरकारी अभियोक्ता यांना अपरिणामकारक सुनावणी फी वा इतर कोणतीही फी वा भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१७१५०२११४३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.07.17 15:11:22 +05'30'

(किशोर भालेराव)
उप सचिव (विधि), गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त, ठाणे
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
६. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
७. विधी व न्याय विभाग (धा.क्र. एसपीपी २०१६/ए.एस.१९/डी-१४,), मंत्रालय, मुंबई.
८. ॲड.श्रीम.संगिता फड, ३०२, एस-३,ईम्पेरिअल हाईट्स, दादाजी कोंडदेव स्टेडिअम समोर, ठाणे.
९. निवड नस्ती (पोल-१०).